# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १८.११.२००८ रोजी संपन्न झालेल्या विशेष सभेचे इतिवृत्त

मंगळवार दिनांक १८ नोव्हेंबर २००८ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १.०५ वा. वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला उपआयुक्त श्री.उध्दव घुगे,नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालीलप्रमाणे स.पालिका सदस्य उपस्थित होते.

०१. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
०२. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०३. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
०४. स.स.श्री.अशरफ मोतीवाला
०५. स.स.श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर मोहम्मद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
१३. स.स.श्री.जेम्स अंबिलढगे
१४. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१५. स.स.सौ.विजयाताई बनकर
१६. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१७. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१८. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१९. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२०. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२१. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२२. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२३. स.स.सौ.इंगळे शकुंतला सांडुजी
२४. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२५. स.स.श्रीमती मिराबाई रामराव शिंदे
२६. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
२७. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद खान
२८. स.स.श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद
२९. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३०. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३१. स.स.श्री.किशनचंद लेखराज तनवाणी
३२. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल

३३. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३४. स.स.सौ.विणा सिध्द गजेंद्र
३५. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनुस
३६. स.स.श्री.शेख इब्राहिम पटेल शेख इमाम
३७. स.स.श्री.हाजी शेर खान अ.रहेमान
३८. स.स.सौ.राऊत छाया विलास
३९. स.स.श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर
४०. स.स.श्री.अशोक गोरखनाथ विरकर
४१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४२. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४३. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिनसईद
४४. स.स.श्री.संतोष सुधाकर जेजुरकर
४५. स.स.श्री.सलीम पटेल समशेर पटेल
४६. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४७. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
४८. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
४९. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
५०. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५१. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
५२. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५३. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५४. स.स.श्री.खुडे विजय किसनराव
५५. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
५६. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
५७. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
५८. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
५९. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६०. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६१. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६२. स.स.श्री.विसपुते शशांक दामोधर
६३. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६४. स.स.सौ.वंदना प्रकाश खंदारे
६५. स.स.श्री.जोशी संजय रामदास
६६. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
६७. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
६८. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
६९. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट
७०. स.स.सौ.जैन अल्पा विकास
७१. स.स.श्रीमती मोमीन सोफिया फिरदोस अय्युबखान
७२. स.स.सौ.अनिता नंदकुमार घोडेले
७३. स.स.श्री.विनोद सोनवणे

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी

**विषय क्र. ३५६ :**

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे कडील अधिसूचना क्रमांक सीईएस-०२८०/प्रक्र.५७/नवि-३४ दिनांक १५.११.२००८ अन्वये उपकर आकारणी संबंधीची शासनाची सम क्रमांक दिनांक २१.१०.२००८ च्या अधिसूचनेतील अनुसूची रद्द केल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७/२ (अ) नुसार उपकर ऐवजी जकात आकारणी करणे बाबत.

**संवाद :**

श्री.सलीम खान :यापूर्वीही उपकर लावण्या विषयी व आजही जकात लावण्या साठी तातडीची बैठक आयोजित केली. प्रशासन नागरीकांना वेठीस धरीत आहे असे वाटते. जकात की उपकर समजायला मार्ग नाही. गेल्या ८ महिण्यात जकातीतून ८० कोटी वसुली झाले विकास कामे कुठेही झालेले नाही हा निधी गेला कुठे याची माहिती घेण्यात यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :शासनाचे जे अद्यादेश आलेले आहे ते वाचून दाखवावे.

श्री.सतीष कटकटे :तातडीने सभा आयोजित करण्याची आवश्यकता का पडली.

याच वेळी मा.महापौर डायस समोर स.सदस्य मोठमोठयाने बोलतात.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:ही विशेष सभा असून जो विषय समोर आलेला आहे त्यावर चर्चा करावी इतर विषयावर येत्या २० तारखेच्या बैठकीत चर्चा करावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :शासनाकडून आलेली अधिसुचना विषयपत्रिके सोबत दिलेली नाही सभागृहात वाचून दाखवावे.

श्री.संजय सिरसाट :स्थायी समितीच्या ४ सदस्यांच्या मागणीनुसार ही सभा आयोजित केलेली आहे. प्रस्ताव काय आहे सचिवाकडून वाचून करून घ्यावा त्यावर चर्चा करावी.

श्री.सलीम खान :उपकर ऐवजी जकात लावावी शासनाचे अद्यादेश आले जकातीतून आलेला ८० कोटीचा निधी कुठे खर्च केले वार्डात २००० रू.चे विकास काम झाले नाही.

श्री.गजानन बारवाल :प्रशासकीय प्रस्ताव काय आहे तो वाचून दाखवावा त्यावर चर्चा करता येईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:शासनाच्या अधिसुचनेची प्रत विषयपत्रिकेसोबत दिलेली नाही त्या जीआरची छायाप्रत काढून सर्व सदस्यांना देण्यात यावी.

मा.महापौर :आताच स.सदस्यांनी मागणी केल्यानुसार सचिव यांनी हा विषय सभागृहासमोर ठेवावा व या बाबतची माहिती सभागृहाला दयावी.

नगर सचिव :मा.आयुक्त यांनी मा.महापौर यांना दिलेले पत्र दिनांक १५-११-२००८.

उक्त संदर्भांकीत विषयाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की? शासनाच्या दिनांक २१ ऑक्टोंबर २००८ अधिसुचने नुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून १ नोव्हेंबर २००८ पासून जकात ऐवजी उपकर लागू करण्यात आला होता. या बाबत शहरातील व्यापारी तथा व्यापारी महासंघाची बैठक घेवून उपकर संदर्भास माहिती देण्यात आली होती तदवतच सदर नोंदणी करणे बाबत आवाहन करण्यात आले होते व्यापारी महासंघाच्या मागणीनूसार तथा मा.सर्वसाधारण सभेने नोंदणी शुल्क रू.६७५/-ऐवजी ४००/- करण्यात आले होते व्यापारी महासंघाच्या मागणीवरूण शहरात ७ ठिकाणी व वार्ड कार्यालयात नोंदणीसाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. परंतु शहरातील व्यापाऱ्यांनी नोंदणी करण्यासाठी सहकार्य केले नाही व १५ दिवसाच्या कालावधीत फक्त १२९ नोंदणी झाली ही बाब अत्यंत

गंभीर व महानगरपालिकेची आर्थिक व्यवस्था खिळखिडी करणारी होती या बाबत महाराष्ट्रातील (ड) वर्ग महानगरपालिकेची नाजूक स्थिती पाहून शासनामार्फत दिनांक १४-११-२००८ ला विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले व दिनांक १५ नोंव्हेंबर २००८ ला शासनाने अधिसुचना जारी केली.

श्री.संजय सिरसाट : जे वाचन ते विषय पत्रिकेवर नाही.

नगर सचिव :हे मा.आयुक्त यांनी मा.महापौर यांना दिलेले पत्र आहे.

श्री.संजय सिरसाट :विषयपत्रिकेत काय नमूद आहे कशासाठी सभा आयोजित केली त्याबद्दल माहिती दयावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे :विषयपत्रिके सोबत या पत्राची छायाप्रत का देण्यात आली नाही.

डॉ.भागवत कराड :विषय पत्रिका ज्यामूळे काढण्यात आली जो शासनाचा अद्यादेश आलेला आहे तो सभागृहासमोर ठेवावा त्यावर चर्चा करावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :शासनाचे अद्यादेश विषयपत्रिकेसोबत दिले नाही. त्याची प्रत सर्व सदस्यांना देण्यात यावी व आता सभागृहात वाचून दाखववावे.

मा.महापौर :विषयपत्रिका व शासनाकडून जो जीआर आलेला आहे तो सचिव यांनी वाचून दाखववावा.

नगर सचिव :मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ क्रमांक सीईएस.०२०८/ प्र.क्र.५७/नवि-३४ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,१९४९ (१९४९ चा मुंबई ५९) च्या कलम १२७ च्या उप-कलम (२) च्या खंड (अअ) च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा आणि या संबंधात त्यास समर्थ करणाऱ्या अन्य सर्व शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन याव्दारे शासनाच्या समक्रमांकाच्या दिनांक २१ ऑक्टोंबर २००८ ला महाराष्ट्र शासन राजपत्र,असाधारण,भाग चार-ब मध्ये प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेतील अनुसूची रद्द करून अकोला,अमरावती,जळगाव,औरंगाबाद,मालेगांव,सोलापूर, कोल्हापूर,अहमदनगर, धुळे, कल्याण डोंबिवली,सांगली-मिरज-कुपवाडा, भिवंडी-निजामपूर,उल्हासनगर,नांदेड-वाघाळा महानगरपालिकांनी स्थानिक परिस्थितीचा विचार करून ठरावाव्दारे उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी शहरांमध्ये/होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर जकातीऐवजी उपकर बसविण्याचा दिनांक निश्चित करण्याचा उचित निर्णय त्यांचे स्तरावर घ्यावा तोपर्यंत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १२७ च्या उप-कलम २(अ) नुसार जकात लावण्याची मुभा राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

श्री.गजानन बारवाल :शासनाकडून हे अधिसूचना केव्हा आली.

नगर सचिव :शासनाकडून सदर अद्यादेश १५ नोहेंबर ०८ रोजी सायंकाळी आलेला आहे.

श्रीमती मेहरून्नीसा खान: १५ ला अद्यादेश येतात तेव्हापासून जकात वसूली का केली नाही महापालिकेचे नुकसान का केले. यास जबाबदार कोण?

श्री.अ.साजेद अ.सत्तार: शासनाचे अद्यादेश आल्यानंतर लगेच जकात वसूलीस सुरूवात का केली नाही. तिन दिवसात जे नुकसान झाले त्यास कोण जबाबदार याचाही खुलासा करण्यात यावा.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर: जकात की उपकर लावायचा हा विषय आहे. स.सदस्यांची मागणी मान्य करून आपण यावर बैठक आयोजित केली त्याबद्दल आपले सभागृहाच्या वतीने अभिनंदन करतो यावर सविस्तर चर्चा व्हावी. या महापालिकेने व या शहरातील व्यापाऱ्यांनी सहकार्य केलेले आहे. शासनाच्या आदेशाचे पालन करून जकात ऐवजी उपकर लावण्याची अंमलबजावणी सुरू करणारी

एकमेव महापालिका आहे. शासनाने आता महापालिकेवर सोपविलेले आहे. यावर साधकबाधक चर्चा व्हावी व जो निर्णय होईल तो महापालिकेच्या व जनतेच्या हिताचा व्हावा.

श्री.प्रशांत देसरडा : उपकर लावण्याचे आदेश आले राज्यातील एकमेव महापालिका आहे शासनाच्या आदेशाचे पालन करून अंमलबजावणी सुरू केली शासनाचे जास्तीचे दर होते ते कमी करून जकातीचे दर लावण्याचा निर्णय घेतला. उपकरास मंजूरी दिली परंतू ते लागू करतांना त्यातील जाचक अटी रद्द कराव्या अशी व्यापाऱ्यांची मागणी होती. २०-२५ वर्षापासून जकात वसूली होत होती त्याऐवजी उपकर आणावा म्हणून एक महिण्यासाठी व्यापाऱ्यांना नोंदणी करण्यासाठी वेळ दिला. परंतु शासनाने लगेच कुठेतरी प्रतिक्रिया म्हणून राजकारण आड येत असल्याने सर्व महापौर व पदाधिकाऱ्यांची बैठक घेवून १५ दिवसात उपकर ऐवजी जकात किंवा उपकर लावण्याचा निर्णय महापालिकेकडे सोपविला कोणताही निर्णय घ्यायला व तो जनतेत अंमलात आणायला वेळ लागत असतो. ड वर्ग महापालिका १४ असून फक्त ७ महापालिकेतच उपकर लावण्याचा निर्णय या शासनाने का घेतला होता कळायला मार्ग नाही. यातही राजकारण आहे व्यापारी आणि महापालिका यांचे हेवेदावे व्हावे म्हणून पुन्हा जकात लावावी म्हणून निर्णय दिला. त्यावेळी अनेक सदस्यांनी या सभागृहात आपले मत मांडले वॅटच्या माध्यमातून बराचसा वाढीव कर शासनाला मिळालेला आहे वॅट लावण्यामागे अशी भुमिका होती कोणताही इतर कर लावणार नाही म्हणून जास्तीच्या दराने सुध्दा व्यापाऱ्यांची मान्य केले. व जे वाढीव वॅटच्या माध्यमातून रक्कम येईल नगरपालिका प्रमाणे शासनाने महापालिकेला दयावी अशी भुमिका सदस्यांनी मांडली होती. शासनाकडे आजही जास्तीची वॅटच्या माध्यमातून रक्कम जमा आहे त्यासाठी जकात व उपकर ही नको शासनाकडे वॅटच्या माध्यमातून जो कर वसुल झाला त्यातून महापालिकेचा हिस्सा म्हणून दयावा. अशी भूमिका मी व अनेक सदस्यांनी मांडली.

याच वेळी सभागृहात स.सदस्य मोठमोठयाने आपसांत बोलतात.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :शासनाकडे किती पैसा आहे किंवा नाही यावर चर्चा करणे योग्य नाही.

श्री.गजानन बारवाल :उपकराच्या माध्यमातून निधी मिळाला असता तर सदस्यांनी ही भुमिका मांडली नसती.

श्री.सतीष कटकटे :शासनाने नागरीकांची दिशाभूल केली त्याबद्दल ते बोलत आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :शासनाने कोणतीही दिशाभूल केली नाही. काय निर्णय घ्यायचा हे सभागृहाला अधिकार आहे. तशी अधिसुचना शासनाकडून आलेली आहे.

श्री.गजानन बारवाल :सभागृहाला अधिकार आहे शासनाने उपकर लावण्याचा निर्णय घेतला होता महापालिकेची आर्थिक परीस्थिती बघता मदत का दिली नाही.

श्री.प्रशांत देसरडा : महाराष्ट्रातील व्यापाऱ्यांचे असे म्हणणे की जकात किंवा उपकर न लावता शासनाने वॅटच्या माध्यमातून आलेला निधी महापालिकेला दयावा.

यावेळी अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्रीमती मेहरून्नीसा खानः उपकर किंवा जकात लावण्याचा शासनाने निर्णय दिलेला आहे. जकात चालू करावी.

डॉ.भागवत कराड : स.सदस्य श्री.देसरडा यांचे म्हणणे आहे जकात व उपकरही नको काही राज्यात विशेषतः गुजरात मध्ये काही वस्तुवर ०.५ व काही वस्तुंवर १ टक्के असा वॅट लावलेला होता. वॅटच्या माध्यमातून या शहरातून किमान ८००

कोटीचा निधी जमा होवू शकतो. वॅट आकारणी केल्यास ४०० कोटी मिळतील. तोपर्यंत महापालिकेचे उत्पन्न वाढवावे म्हणून जकात लागू करण्याबाबत जवळपास सर्वच सदस्यांची व माझीही भावना आहे. हा निर्णय कायमस्वरूपी असू नये वॅटच्या माध्यमातून शासनाने या महापालिकेला निधी दयावा या शहरातून वॅटच्या माध्यमातून जवळपास ४०० कोटी रूपये महानगरपालिकेस मिळावे.

श्री.वसंत नरवडे :व्यापाऱ्यांच्या मागणीनुसार शासनाने अद्यादेश काढून जकात रद्द करून उपकर लावला त्यातील जाचक अटी बघीतल्यानंतर त्यासही व्यापारी विरोध करू लागले. शासनाने ड वर्ग महापालिकेचे महापौर,पदाधिकारी यांचेशी बैठक घेवून जकात की उपकर लावायचा हा निर्णय महापालिकेकडे सोपविला सर्वसामान्य नागरीकांना व महापालिकेचे कामकाज कसे चालेल याचा विचार करून जकात सुरू ठेवावी. व्यापारी या शहराचे नागरीक आहे त्यांनाही महापालिका सुविधा पुरविते जकात,उपकरासही विरोध होत असेल तर महापालिकेने कोणता मार्ग अवलंबवावा असा प्रश्न पडतो वृत्तपत्रात आले जकात व उपकर लावल्यास व्यापारी अंदोलन करणार शासनाला व महापालिकेला गोंधळात टाकण्याचे काम होत आहे शासन व महापालिकेत जोपर्यंत ठोस निर्णय होत नाही तोपर्यंत जकात वसूली करण्याचे काम चालू ठेवावे. महापालिकेने वसुली करावी.

श्री.काशिनाथ कोकाटे : १८ दिवसापूर्वी जकात रद्य करून उपकर लावण्यात आला. पुन्हा शासनाचे पत्र आले की उपकर की जकात लावायचा हे महापालिकेने ठरवावे. देशाचे अर्थमंत्री यांनी एक प्रणाली करून १२ टक्के वॅट लावण्याचा निर्णय घेतला आज कोणत्याही राज्यात जकात घेतली जात नाही वॅटच्या माध्यमातून शासनाकडून निधी यायला पाहिजे होता परंतू उपकर लावण्यासाठी शासनाचे अद्यादेश आले होते. १२ टक्के वॅट १४.०२ टक्के विक्रीकर २.३ टक्के इनकम टॅक्स इतर ४ टक्के असे मिळून जवळपास ३८ ते ४० टक्के टॅक्स लावण्यात आलेला आहे. महापालिका ही केव्हाही शहरातील नागरीक व व्यापारी यांचे सोबत आहे महापालिकेचे हित साधण्यासाठीही आहोत कुणाच्याही दबावाखाली न येता महापालिकेचे उत्पन्न वाढले पाहिजे विकास कामे झाली पाहिजे हा दृष्टीकोन समोर ठेवून जो विकास महापालिकेचा खुंटलेला आहे तो कुण्या एका व्यक्तीच्या मूळे होणार नाही महापालिकेलाच करावा लागेल. शासन वॅटच्या माध्यमातून वसूली करते तो पैसा महापालिकेला मिळवून देण्याचे काम शासनामध्ये या शहराचे जे नेतृत्व करतात त्याचीही जबाबदारी आहे. महापालिकेचा कारभार चालवायचा असेल तर वॅट,जकात सेलटॅक्स च्या माध्यमातून उत्पन्न मिळावयास पाहिजे. १२३ कोटी कशातून मिळणार आहे महापालिका ही व्यापाऱ्यांसोबत आहे महापालिकेला उत्पन्न मिळाले पाहिजे व्यापाऱ्यांसोबत महापालिका शासन दरबारी येण्यास व शासनासोबत चर्चा करण्यास तयार आहे. शासनाने महापालिकेला वॅट किंवा सेलटॅक्सच्या माध्यमातून उत्पन्न दयावे. १५ दिवसाला निर्णय बदलून महापालिकेचे उत्पन्न बुडवून विकास कामे थांबवून ठेवण्याचे धोरण शासनाचे असेल तर अडवणूकीचे धोरण आहे. महापालिकेच्या हिताचा निर्णय घेण्याची आज गरज आहे तो निर्णय आपण घ्यावा.

श्री.विनायक पांडे :महापालिका ही स्वायत्त संस्था असूनही महापालिकेच्या अधिकारावर गदा आणून १४ ड वर्ग महापालिकेपैकी फक्त ७ महापालिकेने उपकर लावावा असे आदेश आले त्यानुसार १८ दिवसापासून उपकराची कार्यवाही चालू केली. व्यापाऱ्यांचा प्रतिसाद मिळत नाही. महापालिकेचे उत्पन्न बंद झाले वार्डात विकास कामे होत नाही स.सदस्य हे विकास कामासाठी येथे येतात २०००रू ची कामे सुध्दा होत नाही. उपकर लावण्यासाठी जाचक अटी होत्या हे व्यापाऱ्यांना माहित नव्हते म्हणून व्यापाऱ्यांचा प्रतिसाद मिळाला नाही. त्यासाठी आज रात्रीपासून जकात वसुलीस सुरूवात करावी सहकार एजन्सीला जकात वसुलीचा यापूर्वी ठेका दिलेला होता त्यांनाच परत दयावे. व्यापाऱ्यांचे तक्रारीचे निराकरण होवून त्यांनाही त्रास होणार नाही याची दखल घ्यावी.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:उपकर लावण्याची कार्यवाही होत होती उपकर लावण्या विषयी जी प्रतिक्रीया होत्या त्या अनुषंगाने उपकर लावलेल्या सर्व महापालिकेचे महापौरांसोबत मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी बैठक घेवून जी अडचण येत होती ती दुर करण्यासाठी नगरविकास विभागाच्या मार्फत महापालिकेने जकात की उपकर जे काय लावायचे तो निर्णय महापालिकेवर सोपविला. त्या बाबत अद्यादेशही आलेला असून वेळोवेळी शासनाच्या बाबतीत अभिनंदन करणे उद्देशून बोलणे हे सभागृहाचे काम नाही. जे शासनाचे आदेश आलेले आहे त्यानुसार योग्य तो निर्णय घ्यावा. उपकर लावलेला होता शासनाचे आदेश आले आता जकात लावण्याची गरज आहे. जकात लावातांना व्यापाऱ्यांचे हित तसेच एजन्सीकडून त्रास होतो त्याचा विचार करावा. शासनाने वॅट लावला तो शासनाचा अधिकार असून १२.५० टक्के वॅट हा सेलटॅक्स कमी करून लावलेला आहे अशी माझी माहिती आहे. जकात घेतली जाते म्हणून वॅट लावू नये असे बंधन नाही. वॅट वरून स्थानिक स्वराज्य संस्थेला वाटा मिळावा. शहराच्या विकासासाठी जकात घेवूनही वसूलीचा विचार करून शासन महापालिकेला निधी देते. आज रोजीपासून जकात वसुलीला सुरूवात करावी टारगेट पुर्ण झाले पाहिजे तशा व्यापाऱ्यांनाही सुचना देवून महापालिकने तीन महिणे वसूली करावी जकात लावल्यास शहरातील विकास कामांना वेग मिळेल कुणी वसुली करायची येत्या २० तारखेच्या बैठकीत योग्य तो निर्णय घ्यावा परंतू आजपासून महापालिकेच्या वतीने जकात वसुलीचे काम सुरू करावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :एजन्सीला काम देवून व्यापाऱ्यांना त्रास होते असे आताच म्हटले परंतू याच बरोबर महापालिकेचे नुकसान ही होवू नये हे याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. महापालिकेकडे निधी नसेल व कुणी लोकप्रतिनिधी स्वत:चा निधी खर्च करून शहरात विकास कामे करीत असेल तर सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करायला पाहिजे. ज्या वेळेत जकात लागली त्यावेळेस कोणत्याही महापालिकेने शासनाकडे सेलटॅक्स रद्द करून वॅट लावला त्यातील रक्कम महापालिकेला दयावी म्हणून मागणी केली नाही. आता आपण मागणी केली. पाठपुरावा करा,लावून धरा शासन वॅटचा निधी महापालिकेला हिस्सा म्हणून देईल अशी अपेक्षा व्यक्त करतो. जकात आकारणी करावी. खाजगी एजन्सी १२३ कोटी वसूल करीत असेल तर महापालिकेने किती वसूल करावयास पाहिजे याकडे ही लक्ष देण्याची गरज आहे. महापालिकेच्या हिताचा निर्णय घ्यावा.

श्री.गजानन बारवाल :जकात कुणी वसुल करायची महानगरपालिका किंवा ठेकेदार याचा बोध होत नाही या बाबत प्रशासनाची भुमिका काय आहे म्हणणे काय आहे खुलासा घ्यावा.

श्री.सलीम खान :जकात महापालिकेने वसुली करावी यापूर्वी खाजगी एजन्सीने ८० कोटी जकातीतून आठ महिण्यात वसूल केले. पाणीपट्टी व मालमत्ता कराच्या माध्यमातून उत्पन्न प्राप्त झाले ही सर्व रक्कम कुठे खर्च केली वार्डात आठ महिण्यापासून विकास कामे बंद आहे. प्रशासनाकडून माहिती घ्यावी.

श्री.सलीम पटेल :उपकराची नोंदणी करण्यासाठी व्यापाऱ्यांना मुदत दिली होती ती मुदत संपण्या आधीच अशासनाचे अद्यादेश आले व आपण जकात लावण्या बाबत निर्णय घेत आहेत मुदतीत व्यापाऱ्यांनी नोंदणी केली नाही तर जकात लावण्यात यावी.

मा.महापौर :या प्रस्तावाविषयी प्रशासन माहिती देईल प्रस्ताव काय होता मा.आयुक्तांनी महापौरांना जे पत्र दिले त्यात काय होते सविस्तर माहिती प्रशासनाने माहिती दयावी.

उपआयुक्त (म) :शासनाकडून दिनांक १५-११-२००८ रोजी अध्यादेश प्राप्त झाल्यानंतर मा.आयुक्त यांनी मा.महापौर यांना जो प्रस्ताव दिला तो खालील प्रमाणे आहे.

श्री.सलीम पटेल :प्रस्ताव काय होता त्याची प्रत सदस्यांना दिली नाही त्यासाठी ती वाचून दाखवावी त्यावर अभ्यास करू दयावा त्यानंतर निर्णय घ्यावा. प्रस्ताव न देता काही ही निर्णय घेवू नये.

मा.महापौर :या विषयी प्रशासनाला सभागृहात माहिती देवू दयावी.

श्री.सलीम पटेल :प्रस्ताव वाचून दाखविण्या ऐवजी त्याची प्रत दयावी.

उपआयुक्त(म) :प्रस्ताव असा आहे की वरील विषयाच्या अनुशंगाने शासनाच्या दिनांक २१ ऑक्टोंबर २००८ अधिसुचने नुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून १ नोव्हेंबर २००८ पासून जकात ऐवजी उपकर लागू करण्यात आला होता. या बाबत शहरातील व्यापारी तथा व्यापारी महासंघाची बैठक घेवून उपकर संदर्भास माहिती देण्यात आली होती तद्वतच सदर नोदंणी करणे बाबत अवाहन करण्यात आले होते व्यापारी महासंघाच्या मागणीनुसार तथा मा.सर्वसाधारण सभेने नोंदणी शुल्क रू.४००/-करण्यात आले होते व्यापारी महासंघाच्या मागणीवरूण शहरात ७ ठिकाणी व वार्ड कार्यालयात नोंदणीसाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती परंतू शहरातील व्यापाऱ्यांनी नोंदणी करण्यासाठी सहकार्य केले नाही व १५ दिवसाच्या कालावधीत फक्त १२९ नोंदणी झाली ही बाब अत्यंत गंभीर व महानगरपालिकेची आर्थिक व्यवस्था खीळखिळी करणारी होती या बाबत महाराष्ट्रातील (ड) वर्ग महानगरपालिकेची नाजूक स्थिती पाहून शासनामार्फत दिनांक १४-११-२००८ ला विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले व दिनांक १५-११-२००८ ला शासनाने अधिसुचना जारी करून शहरात आयात होणाऱ्या मालावर जकात कर लावण्याचे मुभा राहील म्हणून कळविले आहे व मालाच्या प्रवेशावर जकात ऐवजी उपकर लावण्याचा दिनांक आपल्या स्तरावर ठरवून निर्णय घ्यावा म्हणून कळविले आहे. करीता सर्व पदाधिकारी तथा सदस्यांनी चर्चा करून दिनांक १८ नोव्हेंबर २००८ पासून जकात वसूली करण्यास परवानगी दयावी व या बाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि (ड)प्रकरण २(१)ह नुसार तातडीची सभा

बोलावून पूर्वीचे खाजगी अभिकर्ता मे.सहकार एजन्सीज प्रा.लि. यांच्या मार्फत जकात कर वसूल करण्याची मान्यता दयावी.

श्री.संजय जोशी :तीन दिवसापूर्वीच जकात वसूली ही सहकार एजन्सीमार्फत होणार असे स्टेटमेंन्ट मा.आयुक्त यांनी एका दैनिकात केले आहे मा.सर्वसाधारण सभेच्या निर्णयाच्या आगोदर असे स्टेटमेंन्ट करण्याचा अधिकार मा.आयुक्तांना आहे. का? की त्यांनी स्वत:चे मत व्यक्त केले होते.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.आयुक्तांनी प्रस्ताव ठेवला काय?

श्री.अ.साजेद अ.सत्तार :महापालिकेच्या हिताचा निर्णय घ्यावा.

डॉ.भागवत कराड :महापालिकेचे हित कशातून साध्य होईल.

श्री.रेणुकादास वैद्य :सहकार एजन्सीलाच वसूली करण्यासाठी दयावे असे प्रशासन का सांगते. महापालिकेचे कर्मचारी वसूली करू शकणार नाही का?

श्री.अ.साजेद अ.सत्तार :पेपरला काय आले प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.सलीम खान :सहकार एजन्सीलाच वसुली करण्याचे मा.आयुक्तांनी का लिहिले.

उपआयुक्त(म) :आर्थीक वर्ष २००८-०९ साठी जकात वसूली खाजगी अभिकर्तामार्फत जानेवारी २००८ मध्ये स्थायी समितीने मंजूरी दिली होती. मागिल १२३ कोटीच्या दराप्रमाणे. मागिल ३ वर्षापासून जकात वसुलीचा तपशील असा --

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:महापालिका वसुली करू शकते की नाही.

उपआयुक्त (म) :महापालिकेने जकात वसुली करायची झाल्यास इतर विभागातून २०० ते २५० कर्मचारी घ्यावे लागतील त्यामूळे मालमत्ता कर तसेच पाणीपट्टी वसूलीवर त्यांचा परीणाम होईल.

श्री.रेणुकादास वैद्य :यापूर्वी महापालिकेच्या यंत्रनेचे जकात वसूल केली. आजही कर्मचारी आहे.

श्री.देसरडा प्रशांत :जकातीचे कर्मचारी पाणीपट्टी मालमत्ता वसूलीसाठी दिले किती टक्के वसूली जास्त झाली याचाही खुलासा दयावा.

श्री.रविकांत गवळी :जकात वसूली करण्यास महापालिका सक्षम आहे का? जे १८ दिवसात नुकसान झाले ते कोण देणार आहे नुकसान भरपाई सहकार एजन्सी देत असेल तर त्यांना वसुलीचा ठेका दयावा.

श्री.वसंत नरवडे :सहकार एजन्सीकडून वसूली करण्यात येवू नये त्यांचेशी अद्याप महापालिकेने करारनामा केलेला नाही. महापालिकेने जकात वसुल करावी नसता मी मा.न्यायालयात दाद मागेल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:जे आयुक्तांनी दिले ते आम्हाला मान्य नाही सहकार एजन्सीला आम्ही जकात वसुली देवू देणार नाही.

श्री.संतोष खेंडके :जे १८ दिवसात नुकसान झाले ते व्यापारी की सहकार एजन्सी की शासन देणार १८ दिवस जकात वसुली करण्यावर शासनाने जो खोडा घातला व त्यामूळे विकास कामे झाली नाही मी निषेध करतो.

श्री.वसंत नरवडे : ०५ पदाधिकारी यांना विश्वासात घ्यावे सहकार एजन्सीशी महापालिकेचा करारनामा झालेला नाही. प्रशासनाने एका स्थायी समितीच्या बैठकीत म्हटले होते या बाबत सत्य परिस्थिती काय प्रशासनाने खुलासा करावा. महापालिकेचे कर्मचारी जकात वसूली करण्यास सक्षम आहे सहकार एजन्सीला वसुलीकरीता नेमू नये.

श्री.संजय सिरसाट :जकात खाजगी एजन्सी मार्फत की महापालिकेने वसुल करायची यावर चर्चा होत आहे. शासनाने जकात रद्द करून उपकर लागू केला त्यावेळी अनेक व्यापाऱ्यांची फटाके उडविले आनंद व्यक्त केला. एका दैनिकात मा.आयुक्तांनी १२३ कोटीचे महापालिकेचे उत्पन्न आता उपकराच्या

माध्यमातून २०० कोटीपर्यत जाईल असे ठामपणे म्हटले होते. ते बघून व्यापाऱ्यांना असे वाटले की आपले चुकले की काय म्हणून त्यावर अभ्यास केला मा.आयुक्तांच्या दालनात बैठक झाली व्यापाऱ्यांना सुचना दिल्या की जी मुदत दिली त्या मुदतीत रजिस्ट्रेशन करून घ्यावे नसता उपकर वसुली करण्याकरीता जे काही अधिकार दिले ते जास्त अधिकार आयुक्तांना आहे पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करता येतो जेलमध्ये टाकता येते. म्हणून उपकरासही व्यापाऱ्यांनी विरोध करण्यास सुरूवात केली १२९ नोंदणी फक्त येथे झालेले नाही इतर महापालिकेत सुध्दा ही परीस्थिती आहे. व्यापारी जो कर भरतो तो स्वतःच्या खिशातून भरणा करीत नाही सर्वसामान्य नागरीकांच्या पैशातून भरतो उपकराची कार्यवाही ३ महिण्यापासून चालू होती कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जात होते. आता प्रशासन सांगते वसुली करण्यास मॅन पावर नाही. जकातीचे जे कर्मचारी इतर वसुलीसाठी दिले ते वसुली करीत नाही. शासनाचे तीन दिवसापूर्वी जकाती संदर्भात अध्यादेश आले. इतर महापालिकेने त्याच दिवशी जकात चालू केली. या महापालिकेने जकात वसूल करण्यास सुरूवात केली असती तर तीन दिवसात १ कोटीचे नुकसान सहन करावे लागले नसते.यास कोण जबाबदार शासनाचे अध्यादेश येतात जकात वसूलीसाठी कर्मचारी नाही म्हणून म्हटले जाते सर्वसाधारण सभेत ठराव येतो विषय महापालिकेने वसुली करायची की सहकार एजन्सीला दयायचे एजन्सीला दिले म्हणजे आम नागरीक सहकार एजन्सीचे बाजूने निर्णय देतात पेपरला येईल. वसुली कूणी करायची याचा तीन दिवसात महापालिकेची यंत्रणा का जोडली नाही. आता सर्वसाधारण सभेने निर्णय घेतला एजन्सीला वसुलीचे काम दयायचे नाही तर महापालिकेने वसुली करायची झाल्यास काय तयारी केलेली आहे खुलासा करावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:महापालिकेने वसुली करायची झाल्यास काय तयारी केली. तत्कालीन आयुक्त यांनी महापालिकेला जकात वसुली करण्याची वेळ आल्यास जी अधिकारी कर्मचारी यांची यादी तयार केली होती त्यांची अमलबजावणी करावी व यंत्रणा सज्ज करावी.

श्री.सिताराम सुरे :सहकार एजन्सीला वसुलीचा ठेका देवू नये.

श्री.गजानन बारवाल :महापालिकेकडे मॅनपावर नाही तीन दिवसात महापालिकेचे नुकसान झालेले आहे प्रशासनाकडून आलेला प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.संतोष खेंडके :किती तारखेपर्यंत ठेका देणार आहे.

श्री.वसंत नरवडे :सहकार एजन्सी बरोबर करारनामा झालेला नाही असेल तर तसा खुलासा करावा.

याच वेळी मा.महापौर यांच्या डायस समोर अनेक स.सदस्य मोठमोठयाने बोलतात.

मा.महापौर :सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवरून बोलावे.

श्री.सलीम खान :सहकार एजन्सी वसुली करीत होती शासनाने उपकर लावण्याबाबत आदेशीत केले ठेका रद्द करावा लागला आता पुन्हा जकात लागू करावयाची आहे त्याच एजन्सीला दयावे असे कोणत्या नियमात येते.

श्री.गजानन बारवाल :महापालिका एवढी वसूली करू शकत नाही ऑलरेडी सहकार एजन्सीला ठेका दिलेला होता आजपासून त्यांना वसूली करण्याबाबत निर्णय घ्यावा. ज्या अडीअडचणी येत असतील त्यावर अंकूश ठेवण्याचे काम प्रशासनाचे आहे.

मा.महापौर :एका वेळेस एकाच स.सदस्यांनी बोलावे जेणे करून इतिवृत्तांमध्ये सविस्तर नोंद घेता येईल.

श्री.वसंत नरवडे :गोंधळ घालून सहकार एजन्सीला सहकार्य करू नये.

श्री.संतोष खेंडके :सहकार एजन्सीला वसूलीसाठी नेमायचे असे प्रशासनाचे मत असेल तर मान्य करावे. विकास कामात खिळ घातलेली आहे जनतेच्या हितासाठी दयावे.

श्री.वसंत नरवडे :महापालिकेच्या कर्मचाऱ्यांमार्फत वसूली करायची असेल तर गोंधळ आवरा सहकार एजन्सीकडे ठेका जाईल.

श्री.महेश माळवतकर :ज्या दिवशी शासनाचा अध्यादेश आला त्याच दिवशी इतर महापालिकेने जकात वसुलीस सुरूवात केली ही महापालिका जकात वसुल सुरू करण्यास सक्षम नव्हती का? नाक्यावर महापालिकेचे कर्मचारी दिसत नाही सहकार एजन्सीचे दिसतात त्यांना बोलविले होते का कर्मचाऱ्यांचे पगार एफडी तोडून केला विकास कामे होत नाही. ५-६ महिण्यापासून जकात की उपकर विषय चालू आहे प्रशासन योग्य निर्णय घेवू शकले नाही गेल्या १५ दिवसात ६ कोटीचे नुकसान झाले यास कोण जबाबदार जकात कोण वसूल करणार वर्तमानपत्रात बातम्या सभागृहावर सोपवून सदस्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न होत आहे हे योग्य नाही. प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.सिताराम सुरे : महापालिकेच्या कर्मचाऱ्यांमार्फत वसूली करावी यापुर्वी या एजन्सीला जकात नाक्यावर वाहन चालक यांना मारहाण केली आहे जिन्सी पोलीस स्टेशनमध्ये त्यांचे विरोधात तक्रार आहे. ही एजन्सी नागरीकांची आर्थीक पिळवणूक करते खाजगी एजन्सीला दयायचे असेल तर टेंडर काढावे जो कुणी जास्त रक्कम देईल त्यांना दयावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :जकात की उपकर लावायचा हा प्रश्न समोर आहे त्या बाबतीत निर्णय घ्यावा.

श्री.रविकांत गवळी :या विषयावर अनेक सदस्यांनी आपआपले मत मांडले. प्रशासनाकडे खुलासा मागविलेला आहे अदयाप दिलेला नाही. महापालिकेला उत्पन्न असणे आवश्यक आहे उपकराच्या माध्यमातून रक्कम उपलब्ध झालेली नाही. उपकराबाबत चार महिण्यापासून कार्यवाही चालू असतांना प्रशासनाने कोणतीही तयारी केलेली नाही. शासनाने उपकर लागू केला त्यानुसार कार्यवाही सुरू केली ३० दिवस व्यापाऱ्यांना नोंदणी करण्यासाठी मुदत दिली. १२७ व्यापारी यांनी नोंदणी केली ज्या अटी टाकल्या त्या जाचक स्वरूपाच्या असल्याने व्यापारी प्रतिसाद देत नाही. शासनाने उपकरा संबंधीत दिलेले दर जास्त होते व्यापाऱ्यांच्या मागणीनुसार जे जकातीचे दर होते तेच दर उपकराच्या संदर्भात ठेवावे म्हणून जकातीचे जे दर होते त्याच दराने उपकर आकारणीचा निर्णय घेतला जकात बंद झाल्यानंतर इतर वसूली नाही त्यामूळे शासनाने पुन्हा जकात लागू करण्या संदर्भात अध्यादेश दिले. त्यामूळे स्थायी समितीच्या ०५ सदस्यांच्या मागणीनुसार या विशेष सभेचे आयोजन केलेले आहे. जकात वसूली करण्यासाठी महापालिका सक्षम आहे का? आताच प्रशासनाने म्हटले मॅन पावर नाही कर्मचारी इतर वसुलीसाठी दिले परंतू मालमत्ता कर व पाणीपट्टीची वसुली किती टक्केनी वाढली याचा पण खुलासा झालेला नाही. दैनंदिन विकास कामे सुध्दा करू शकत नाही त्यासाठी महापालिकेकडे निधी पाहिजे. वार्डातील नागरीक नगरसेवकांना विकास कामाबद्दल मागणी घालतात. सहकार एजन्सीला यापूर्वी ठेका दिलेला होता परंतू अनेक व्यापाऱ्यांना त्रास झाला तो आता होणार नसेल तर वसुली करण्याकरीता या एजन्सीला देण्यास हरकत नसावी. करारनामा

झालेला नसेल तर तो रितसर करून घ्यावा व्यापारी यांना त्रास होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :आमसभेत एजन्सी ठरवायची नाही. उपकर की जकात लावायचा हा निर्णय घ्यावा.

मा.महापौर :प्रशासनाचे एजन्सीच्या नावाने मला पत्र दिले. सभागृहात काय प्रस्ताव आहे वाचून दाखववावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :प्रशासनाने जे दिले ते वाचून दाखवावे.

मा.महापौर :प्रशासनाचा काय प्रस्ताव आहे तो वाचून दाखववावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :खुलाशाची आवश्यकता नाही. उपकर ऐवजी जकात लावण्यात यावे विषयांतर करू नये. विषय पत्रिकेवर जे आहे त्यावरच निर्णय घ्यावा. वसुल कुणी करायची हे प्रशासन ठरवेल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:आतापासूनच वसूलीस सुरूवात करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :सहकार एजन्सीला का दयायचे प्रशासनाने सुचविले याचा खुलासा करावा.

मा.महापौर :प्रशासनाचे एजन्सीला नावाने देणे बाबत पत्र माझेकडे आलेले आहे तो प्रस्ताव आला.

श्री.काशिनाथ कोकाटे : कुणाच्या दबावाखाली आपण येवू नये प्रशासनाला वसूल करणेचे आदेश करावे. यापूर्वी महानगरपालिकेने वसूली केलेली आहे

मा.महापौर :माझेकडे जो विषय प्रशासनाचा आलेला आहे त्यात असे म्हटले की दिनांक १८-११-२००८ पासून जकात वसूल करण्यास परवानगी दयावी व या बाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि (ड)प्रकरण २(१)ह नुसार तातडीची सभा बोलावून पूर्वीचे खाजगी अभिकर्ता मे.सहकार एजन्सीज प्रा.लि.यांच्या मार्फत जकात कर वसूल करण्याची मान्यता दयावी असा प्रस्ताव माझेकडे पाठविलेला आहे.

श्री.विनायक पांडे :प्रशासनाचा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.वसंत नरवडे :महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून वसूली व्हावी.

याच वेळी सभागृहात मोठमोठयाने बोलणे चालू असते.

डॉ.भागवत कराड :जकात बंद करून उपकर लावण्याची व्यापाऱ्यांची मागणी होती त्यानुसार उपकर लावण्याचा निर्णय घेतला मध्येच शासनाचे अध्यादेश आले. त्यानुसार प्रशासनाचे सुध्दा पत्र आले. महापालिकेची आर्थिक परीस्थिती बिकट झालेली आहे जे उत्पन्न मिळावयास पाहिजे ते मिळत नाही. विकासाची कामे करायची असेल तर उत्पन्न वाढविले पाहिजे. जकातीतून येणारे उत्पन्न हे महापालिकेचा मुख्य स्त्रोत आहे. प्रशासनाचा जो प्रस्ताव आहे तो मंजूर करावा आज रात्री १२-०० वाजेपासून जकात वसुली करण्यास सुरूवात करावी.

श्री.वसंत नरवडे : ०५ ही पदाधिकारी यांनी यावर मत व्यक्त करावे. योग्य तो निर्णय घ्यावा. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून वसूली करण्यात यावी.

श्री.गजानन बारवाल :आज पासून जकात वसुली करण्यास सुरूवात करावी. प्रशासनाने जो प्रस्ताव दिला तो मंजूर करावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :जो विषय समोर आला त्यावरच रूलींग दयावी.

मा.महापौर : आपण सभागृहामध्ये जकात लावावी किंवा कसे याबाबत सविस्तर अशी चर्चा केलेली आहे. प्रशासनाने जो प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावाप्रमाणे आणि सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र.सीईएस-०२८०/प्र.क्र.५७/नवि-३४

दि.१५-११-२००८ अन्वये महाराष्ट्र शासनाने समक्रमांकाची उपकर आकारणी संबंधीची अधिसूचना ही रद्द केलेली आहे. त्यामूळे दिनांक १-११-२००८ पासून आतापर्यंत महानगरपालिकेला उपकर किंवा जकात पोटी कोणतेच उत्पन्न प्राप्त झालेले नाही. त्यामूळे प्रशासनाने ठेवलेल्या प्रस्तावानुसार जकात वसुली सुरू करावी. ही जकात वसूली प्रशासनाच्या प्रस्तावानुसारच करावी. त्याचप्रमाणे दि.१८-११-२००८ च्या मध्यरात्रीपासून प्रशासनाने ठेवलेला प्रस्ताव मान्य करण्यात येतो मा.आयुक्तांचा प्रस्ताव तो मान्य करण्यात येतो. फेब्रुवारी नंतरच्या कालावधीची टेंडर प्रक्रीया सुरू करावी. त्यानुसार वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय मुंबई यांचे कडील अधिसुचना क्रमांक सीईएस-०२८०/प्र.क्र.५७/नवि-३४ दिनांक १५.११.२००८ अन्वये उपकर आकारणी संबंधीची शासनाची सम क्रमांक दिनांक २१.१०.२००८ च्या अधिसूचनेतील अनुसूची रद्द केल्यामूळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७/२ (अ)नुसार उपकर ऐवजी जकात वसुली करणे आणि ही जकात वसुली मा.आयुक्तांनी/प्रशासनाने प्रस्तावित केल्याप्रमाणे दिनांक १८.११.२००८ मध्यरात्रीपासून पूर्वीचे खाजगी अभिकर्ता मे सहकार एजन्सीज यांचेमार्फत जकात वसूल करण्यास व पूढील कालावधीसाठी निविदा प्रक्रीया सुरू करण्यास मान्यता देण्यात येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद